बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ११ | बुधवार,दि.२२ फेब्रुवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

जळीत प्रकरणातील तिघांचाही मृत्यू आरोपीला न्यायालयीन कोठडी

गोंदिया:- शहराजवळील सूर्याटोला येथे जावयाने आपल्या सासऱ्यासह पत्नी व मुलाला पेट्रोल घालून जाळल्याची घटना बुधवारी (दि. १५) पहाटे १ वाजताच्या सुमारास घडली होती. या प्रकरणात अटकेनंतर पीसीआरमध्ये असलेल्या आरोपी किशोर श्रीराम शेंडे (४०,रा. भिवापूर, ता.तिरोडा) याला (दि.२०) जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयीन कोठडी सुनावल्याने आरोपीची भंडारा तुरुंगात रवानगी करण्यात आली.असे असतानाच आज २१ फेबुवारीला सकाळी ६ वाजेच्या सुमारास या घटनेतील आरती किशोर शेंडे या जळीत महिलेचा नागपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला.तर घटनेच्या दिवशी आरोपीचे सासरा व मुलाचा मृत्यू झालेला होता.

या घटनेमुळे सुर्याटोलावासियांच्या मनात आरोपीविरुध्द राग निर्माण झाला असून आरोपीला फाशिची शिक्षा व्हावी व न्यायालयात आणतांना ताब्यात घेऊन मारहाण करण्याच्या शेकडो महिला पुरुष न्यायालय परिसरात एकत्र आले होते.मात्र लगेच शहर व रामनगर पोलिसांनी परिस्थिती बघून अधिकचा बंदोबस्त करीत आरोपीला सुरक्षित बाहेर काढले.

आरोपी किशोर शेंडे (रा.भिवापूर) याने दारावर व घरावर पेट्रोल टाकले. पेट्रोल टाकल्यावर त्याने दार ठोठावले. यावेळी कोण आहे म्हणून दार उघडण्यासाठी आरती शेंडे गेली असता दार उघडताच त्याने पेट्रोल टाकलेल्या जागेवर माचीसची काडी टाकून जाळले. आरोपी हा आपल्या कुटुंबाला व सासऱ्याच्या कुटुंबाला संपवायला निघाला होता. परंतु त्याची मुलगी स्वरांजली ही घटनेच्या दिवशी आपल्या आत्याकडे झोपायला गेली होती.तर आरोपीची सासू ममता मेश्राम या आपल्या नवीन घराचे बांधकाम सुरू असल्याने त्या नवीन घराकडे असल्यामुळे त्या सुद्धा बचावल्या. घटनेच्या रात्री आरोपीचा साळा हा मजुरीसाठी बालाघाट येथे गेला होता,त्यामुळे तो सुध्दा बचावला.

या प्रकरणात आरोपींने बायको माहेरी आल्याचा राग आल्याने आपणच पेट्रोल टाकून जाळल्याची कबुली पोलिसांना तपासादरम्यान दिली.तसेच त्याच्याकडून घटनेकरीता वापरण्यात आलेली डबकी जप्त करण्यात आली. या घटनेसंदर्भात रामनगर पोलिसांनी भादंविच्या कलम ३०२,३०७,४३६,५०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.रामनगरचे पोलीस निरिक्षक संदेश केंजळे यानी तपास केला.

आरोपीला फाशीच्या शिक्षेकरीता सुर्याटोलावासी न्यायालय परिसरात



चारित्र्याच्या संशयाने केला घात

आरोपी किशोर व आरती यांचे सन २०१३ ला लग्न झाले. तेव्हापासून तो आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यातून त्याने तिला अनेकदा मारहाण केली. या मारहाणीला त्रस्त होऊन ती महिनाभरापूर्वी मुलांना घेऊन माहेरी आली होती. किशोर शेंडे मारहाण करीत असल्याने त्याच्या विरोधात आरतीने तिरोडा पोलिस ठाण्यात मारहाण केल्याच्या तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींच्या आधारे तिरोडा पोलिसात या आरोपीवर अदखल-पात्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.

वाघ नदीवरील पूल धोकादायक

कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता: जडवाहनांच्या वाहतुकीने वाढविली चिंता

गोंदिया: सालेकसा-आमगाव मार्गावर वाघ नदीवरील असलेला पूल जडवाहनंच्या वाहतुकीमुळे धोक्यात आलेला असून हा पूल केव्हाही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने या पुलाला वाचविण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.

सालेकसा आणि आमगाव तालुक्याला विभाजीत करणाऱ्या वाघ नदीवरील पूल १९७६ साली बांधण्यात आला असून आज या पूलाला ४६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पुलाने एकीकडे आमगाव आणि सालेकसा तालुक्याला जोडण्याचे काम केले. परंतु कालांतराने या पुलावरुन आमगाव-सालेकसा आणि छत्तीसगड राज्याकडे मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-ज होऊ लागली.

एवढेच नव्हे तर मध्यप्रदेश राज्याला महाराष्ट्र राज्याशी जोडताना याच पुलावरुन सगळी वाहने ये-जा करीत राहिली. मध्यप्रदेश राज्यात दिग्वीजय सिंग मुख्यमंत्री असताना त्यंनी महाराष्ट्र सरकारशी चर्चा करुन सतत १५-२० वर्षे याच पुलावरुन रात्रंदिवस मध्यप्रदेशातील बस, ट्रक इत्यादी वाहनांची ये-जा करण्यासाठी समझोता केला होता. त्यामुळे या पुलावर वाहनांचा भार वाढत असताना पुलाखाली अनेक ठिकाणी भेगा सुद्ध पडल्या होत्या. त्यानंतर लांजी तालुक्याला सरळ आमगावशी जोडण्यासाठी आमगाव आणि कुलपा गावाच्या दरम्यान शिवराजसिंग मुख्यमंत्री असताना नवीन पुलाची बांधणी करण्यात आली. तेव्हा असे वाटत होते की या पुलावरील ओझे कमी होतील. परंतु, बालाघाट जिल्ह्यातून रावणवाडी मार्गे येणारे ट्रक व इतर जड वाहने याच मार्गावरील पुलावरुन छत्तीसगड राज्यात ये-जा करु लागली. मागील काही वर्षांपासून तर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील जडवाहने, डोंगरगड-सालेकसा मार्गे आमगाववरुन गोंदियाकडे जातात आणि पुन्हा राष्ट्रीय महामार्गावर धावतात. त्यामुळे अलीकडे या पुलावरुन २४ तास माल भरलेले ट्रक आणि इतर जडवाहनांची वाहतूक सुरु असते. दिवसभर या पुलावरुन तिन्ही राज्यातील वेगवेगळ्या प्रकारची वाहने धावत असतात. तर रात्रभर क्षमतेपेक्षा जास्त वजनाचे माल भरलेले ट्रक या पुलावरुनच जातात. त्यामुळे या पुलावरुन वाहतूक करणे धोकादायक झाले आहे.

काही वर्षापुर्वी भेगा बुजवण्याचे झाले काम

पास-सचा वर्षापुर्वी या पुलाखाली अनेक भेगा पडलेल्या दिसून आल्या. तेव्हा बांधकाम विभागाने दुरुस्तीच्या नावावर भेगांमध्ये सिमेंट क्रांकीट भरण्याचे काम केले होते. परंतु भेगा भरल्यामुळे पुलाचा कमकुवतपणा दूर झाला असावा का, असा प्रश्न लोकांना पडत आहे. त्यामुळे एक तर पुलावरुन जड वाहतूक थांबविली पाहिजे. सोबतच पूल मजबूत करण्यासाठी कायमची उपाययोजना करण्याची गरज आहे.

क्षमतेपेक्षा जास्त वजनाचे धावतात ट्रक

आमगाव-सालेकसा मार्गावर ये-जा करणाऱ्या वाहनांमध्ये १८ टन वजनापर्यंत क्षमतेची वाहने धावू शकतात. एवढी क्षमता या पूल आणि मार्गाची आहे. परंतु काही वर्षापासून या मार्ग व पुलावरुन ४० ते ५० टन वजनापर्यंत माल भरलेले भारी वाहन सतत ये-जा करीत आहेत. त्यामुळे एकीकडे आमगाव-सालेकसा महामार्गाची अतिशय दुर्दशा झालेली आहे. तर जड वाहनांची क्षमता सहन करु न शकलेल्या पुलावरुन जर अशी वाहने रात्रंदिवस धावत असतील तर वाघ नदीवरील हा पुल केव्हा कोसळेल आणि केव्हा अनर्थ घडेल हे सांगता येत नाही. ही वस्तुस्थिती परिवहन तसेच बांधकाम विभागाला माहिती असून सुद्धा कोणतेही ठोस पाऊल उचचले जात नाही. एखाद्या अपघात घडण्याची संबंधित विभाग वाट पाहत आहे का, असेच दिसून येत आहे.

डांगुरली शाळेच्या अग्रवाल शिक्षकाचे विद्यार्थ्यानीशी अश्लील चाळे

गोंदिया: गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डांगुरली येथील एका शिक्षकांने २० फेबुवारीला शाळेतील दोन विद्यार्थीनींच्या अश्लिल चाळे करुन गैरवर्तणुक केल्याची घटना उघडकीस आली आहे.यासंदर्भात सदर विद्यार्थीनी मुख्याध्यापकासह पालकांकडे सदर प्रकरणाची माहिती दिल्यानंतर मुख्याध्यापक तेजराम बोहणे यांनी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांना पत्र लिहून याबाबत माहिती दिली,मात्र अद्यापही या प्रकरणात कुठलीही कारवाई संबधित शिक्षकावर वृत्त लिहिपर्यंत झालेली नव्हती. गावातील पालकांनी गोंदिया पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना तक्रार करुन शिक्षक संजय घनश्यामदास अग्रवाल यांच्यावर कारवाई करुन शाळेतून शिक्षकाला हटविण्याची मागणी केली आहे.

माहितीनुसार इयत्ता पाचवीच्या विद्याथीनीसोबत सदर शिक्षकांने अश्लिल भाषेत संभाषण करुन विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार मुख्याध्यापकांना देण्यात आली.त्यानंतर दोन्ही विद्याथीनीनी आपल्या पालकांना याबाबत माहिती दिली.

सदर प्रकरणाची माहिती गावात पोचताच पालकांनी शाळेत धाव घेत मुख्याध्यापक बोहणे यांना सदर शिक्षकावर त्वरीत कारवाई करण्याची मागणी केली. मुख्याध्यापक तेजराम बोहणे यांनी सदर शिक्षकाविरुध्द शिक्षणाधिकारी कार्यालयाला माहिती देत कारवाईकरीता योग्य ते मार्गदर्शन मागविले.

दरम्यान दासगाव केंद्राचे केंद्रप्रमुख अनुप नागपूरे यांना या प्रकरणासंदर्भात विचारणा करण्यात आली असता अशा कुठलाच प्रकार घडला नसून असभ्य वर्तणुक केल्याप्रकरणी त्यांनी ग्रामशिक्षण समितीसमोर माफीनामा लिहून दिल्याचे सांगत गावातच प्रकरण निकाली निघाल्याचे सांगितले.तसेच शिक्षकाची बदली करण्याची मागणी पालकांनी केल्याचेही सांगितले.

बग्गा प्रकरणात बांधकाम विभाग लागले पोलीस कारवाईला

गोंदिया- गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातंर्गत गेल्या अनेक महिन्यापासून चर्चेत असलेल्या कंत्राटदार पी.ए.बग्गा प्रकरणात जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्यावतीने अखेर २१ फेबुवारीला गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे बग्गा प्रकरण साप्ताहिक **बेरार टाईम्सने** बाहेर काढून सातत्याने जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधत बग्गा प्रकरणात टेंडर लिपिकासह अधिकारयाची चौकशी कधी होणार या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करुन मुख्यमंत्री व पालकमंत्र्याना या प्रकरणात सखोल चौकशीकरीता लक्ष वेधले होते.त्यानंतर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला जाग आली असून कागदपत्रांची जुळवाजुळव करुन सदर प्रकरणात तक्रार दाखल करण्याकरीता पोलीस विभागाला लागणाऱ्या कागदपत्राची जुळवाजुळव सुरु झाली आहे.

मात्र बांधकाम विभागाने तक्रार दाखल करतांना पुन्हा हयगय करीत ज्या स्वाक्षरीच्या आधारे टेंडरप्रकियेत गोंधळ घालण्यात आला.ती कागदपत्र पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीच्या सोबतच्या कागदपत्रात नसल्याने पुन्हा सर्व कागदपत्र सादर करण्याच्या सुचना पोलीस विभागाने दिल्या.त्यानुसार कागदपत्रे सादर केल्यानंतरच गुन्हा दाखल होणार आहे.

कंत्राटार बग्गा विरुध्द कारवाई करण्यासाठी बांधकाम विभागाने पुढाकार घेतला असला तरी त्या प्रकरणात टेंडर क्लर्क याचीही तेवढीच महत्वाची भूमिका असून तडजोडीच्यावेळी उपस्थित अधिकारी यांनीही कागदपत्रावरील स्वाक्षरी का बघितली नाही.की बघून त्यांनी जाणिवपुर्वक कानाडोळा केला याचा उलगडा होण्यासाठी या तक्रारीत संबधित कंत्राटदारासह टेंडर क्लर्क आणि संबधित सर्वांचीच चौकशीचा उल्लेख त्या तक्रारीत होणे गरजेचे आहे.तेव्हा कुठे या प्रकरणात सर्वसंधी उपलब्ध करुन देणारा क्लर्क की अधिकारी याचाही उलगडा होईल.सोबतच कंत्राटदाराच्या मृत्यूनंतर संबधित विभागाने देय रक्कमेचे धनादेश देतांना चौकशी का केली नाही,हा सुध्दा प्रश्न उपस्थित झाला कंत्राटदाराला देण्यात आलेला ७० लाख रुपये प्रशासन परत घेण्यासाठी काय कारवाई करते याकडेही लक्ष लागले आहे.

१२ वी इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत ६ गुणांच्या चुका

गोंदिया: इयत्ता बारावीच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत ६ गुणांसाठी विचारलेल्या प्रश्नांऐवजी चक्क उत्तरेच छापून आली आहेत.फेबुवारी २०२३ यावर्षीच्या बोर्डाच्या परीक्षा २१ फेबुवारीपासून सुरूझाल्या असून पहिला पेपर इंग्रजी भाषेचा होता. इंग्रजी विषयाकरिता ८० गुणांची कृतिपत्रिका असते.त्यात प्रश्न क्रमांक ३ मध्ये १४ गुणांसाठी कवितेवर आधारित प्रश्न विचारले जातात. आजच्या प्रश्नपत्रिकेत र-३,र-४, र-५ या तीन कृर्तीमध्ये प्रश्नांऐवजी चक्क उत्तरे छापून आली. त्यामुळे विद्याथी संभ्रमावस्थेत सापडले. काही विद्यार्थ्यांनी तर गोंधळून प्रश्नांची उत्तरे लिहिलीच नाहीत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बोर्डाने तयार केलेल्या मॉडेल आन्सरमधील र-३, र-४, र-५ ही उत्तरे सूचानासह जशीच्या तशीच प्रश्नपत्रिकेत छापून आली आहेत.चुकीच्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जाऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. बोर्डाने विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात सरसकट ६ गुण द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.



दोन दिवसीय गोंदिया जिल्हा ग्रंथोत्सवाचे आयोजन बुधवारला

गोंदिया-: उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी गोंदिया यांच्या वतीने २२ व २३ फेबुवारी २०२३ ला श्री. गुरुनानक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अग्रसेन गेट जवळ, गोंदिया येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सव व पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ग्रंथोत्सवाची सुरुवात बुधवार २२ फेबुवारी रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीने होणार आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन ११ वाजता पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते राहणार आहेत. अशी माहिती प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अस्मिता मंडपे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दोन दिवसीय ग्रंथोत्सवाला साहित्य प्रेमी, नागरिक व विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. बुधवार २२ फेबुवारी रोजी उद्घाटनानंतर दुपारी १.३० ते ३.०० या दरम्यान स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर परिसंवाद होणार आहे. उपसंचालक सांख्यिकी रुपेशकुमार राऊत, जिल्हा नियोजन अधिकारी मानव विकास श्रीराम पाचखेडे, प्रा. किशोर पटले व विदर्भ स्टडी सर्कलचे त्रिलोक शेंडे या परिसंवादात सहभागी होणार आहेत.

जहाल नक्षलवादी दाम्पत्यास हैदराबाद येथून अटक; १७ वर्षांपासून होते फरार

गडचिरोली:- नक्षल चळवळीतून बाहेर पडून सुमारे १७ वर्षांपासून फरार असलेल्या जहाल नक्षल दाम्पत्यास गडचिरोली पोलिसांनी सोमवारी सकाळी तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथून अटक केली. टुगे ऊर्फ मधुकर चिन्ना कोडापे (४२, रा. बस्वापूर, ता. अहेरी) व शामला ऊर्फ जामनी मंगलू पूनम (३५, रा. बंडागुडम, छत्तीसगड) अशी अटक करण्यात आलेल्या नक्षल्यांची नावे आहेत.

गडचिरोली पोलिसांनी दोघांवरही मागील वर्षभरापासून पाळत ठेवली होती. पोलिसांनी अटक केलेला टुगे ऊर्फ मधुकर कोडापे हा नक्षल दलममध्ये भरती झाल्यानंतर अहेरी दलमचा सदस्य होता. पुढे २००६ पर्यंत तो अहेरी, जिमलगट्टा आणि सिरोंचा दलमचा कमांडर झाला. त्यानंतर तो दलम सोडून फरार झाला. त्याच्यावर ९ खून, ८ चकमकी, २ दरोडे, ४ जाळपोळ, १ खुनाचा प्रयत्न व १ इतर असे २५ गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याची पत्नी शामला ऊर्फ जामनी पुनम ही अहेरी दलमची सदस्य होती. तिच्यावर १ खून, ५ चकमक, १ जाळपोळ, १ दरोडा व १ इतर असे ९ गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्र शासनाने तिच्यावर २ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

जानेवारी २०२२ ते आतापर्यंत गडचिरोली पोलिसांनी ६४ नक्षल्यांना अटक केली आहे. आजची कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक अनुज तारे, कुमार चिंता व यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.टुगे कोडापे व त्याची पत्नी शामला हे दोघेही २००६ मध्ये दलम सोडून फरार झाले होते. त्यानंतर दोघेही नावे बदलून वेगवेगळ्या ठिकाणी राहू लागले.

सध्या ते आपली ओळख लपवून हैदराबाद येथे वास्तव्य करीत होते. टुगे हा एका कंपनीत वॉचमन, तर शामला ही एका कार शोरुममध्ये काम करीत होती. त्यांच्यावर गडचिरोली पोलिसांनी वर्षभरापासून पाळत ठेवली होती. अखेर सोमवारी त्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

छत्तीसगड सीमेवर नक्षल हल्ल्यात दोन पोलीस शहीद,एक जखमी

गोंदिया:- महाराष्ट्र-छत्तीसगड राज्याच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगड राज्यातील बोरतलाव पोलीस चौकीअंतर्गत सोमवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास १०-१२ च्या संख्येत असलेल्या महिला पुरुष नक्षल्यांच्या टोळीने विनाशस्त्र चायपिण्याकरीता गेलेल्या दोन पोलिसांना ठार केल्याची घटना घडली.

या घटनेनंतर महाराष्ट्र व छत्तीसगड सीमेवर पोलिसांनी बंदोबस्त वाढविला असून जंगलात सर्चिंग सुरु केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सोमवारला बोरतलाव पोलीस चौकीतील राजेश प्रतापसिंह व ललीत यादव आपल्या एका सहकारी मित्रासह मोटारसायकलने चाय पिण्याकरीता पोलीस चौकीपासून मुख्य राज्यमार्गावर असलेल्या ढाब्याकडे गेले असता आधीच त्या परिसरात दबा धरुन बसलेल्या नक्षल्यांनी यांच्यावर गोळीबार केला. यात दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर तिसरा जखमी असून जखमी शिपायामुळेच सदर घटना पोलिसांना कळले. नक्षल्यांनी मोटारसायकलला आग लावून घटनास्थळावरुन बोपारा केला.

शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविणार पार्किंग प्लाझा,न.प.चा नविन प्रयोग

पहिल्या तीन तासांसाठी पार्किंग नि:शुल्क: नगर परिषदेने काढले पत्र

गोंदिया: शहरातील बिघडलेल्या वाहतूक व्यवस्थेची घडी सुधारण्यासाठी वाहतूक नियंत्रण विभाग व नगर परिषदेच्या माध्यमातून विविध उपाययोजना करण्यात आल्या. पण त्या सर्व फेल ठरल्याने आता कोट्यावधी रूपये खर्चून तयार तयार करण्यात आलेल्या पार्किंग प्लाझाचा आधार घेतला जात आहे. त्यासाठी पार्किंग प्लाझामध्ये वाहन पार्क करणाऱ्या पहिल्या तीन तासांसाठी कुठलेच शुल्क आकारले जाणार नसल्याचे पत्र सोमवारी (दि.२०) न.प.चे प्रशासक करण चव्हाण यांनी काढले.

गोंदिया शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी शहरातील बाजारपेठ परिसरातील रस्त्यांचे सिमेंटीकरण करुन रस्त्यांची रुंदी वाढविण्यात आली. यानंतर वाहनचालकांना शिस्त लागावी, वाहनचालक रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी ठेवू नये यासाठी वाहतुक नियंत्रण विभागाने एक दिवस आड वन वे पार्किंगचा प्रयोग राबविला; पण यानंतरही वाहतुकीची कोंडी सोडविण्यात या दोन्ही विभागाला यश आले नाही. शहरातील वाहतुकीला शिस्त नसल्याने दर मिनिटाला वाहतुकीची कोंडी असल्याने शहरवासीय त्रस्त झाले आहे.

शहरातील बाजारपेठ परिसरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी शहर पोलीस स्टेशनच्या मागील भागात कोट्यावधी रुपये खर्चून नगर परिषदेने पर्किंग प्लाझा तयार केला आहे. पण या ठिकाणी वाहनचालक वाहन पार्किंग करीत नसून रस्त्यालगत उभी करीत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी कायम आहे. पार्किंग प्लाझामध्ये वाहने पार्क करावी यासाठी नगर परिषदेने पहिल्या तीन तासासाठी कुठलेच शुल्क न आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

असे राहणार शुल्क

नगर परिषदेचे प्रशासक करण चव्हाण यांनी सोमवारी पार्किंग प्लाझाच्या शुल्का संदर्भात पत्र काढले आहे. त्यात पहिल्या तीन तासांसाठी कुठलेच शुल्क आकारले जाणार नाही. दुचाकीसाठी प्रति सहा तासांसाठी २० रुपये आणि चारचाकी वाहनांसाठी प्रति सहा तासांसाठी ५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

रस्त्यावरील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा

शहरातील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांचा दिवसभर वावर असतो. त्यामुळे या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी आहे.

संपादकीय

तेल गेले, तूप गेले, हाती आले धुपाटणे

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षाचे निवडणूक चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला बहाल केल्यामुळे उद्धव ठाकरे व त्यांचे उरलेले सहकारी संतप्त होणे स्वाभाविक आहे. गेले चार महिने उद्धव ठाकरे, संजय राऊत व अन्य नेते घसा फोडून सांगत होते की, धनुष्यबाण आमच्याकडेच राहणार, बघू या कोण ते काढून घेतो, अशी भाषा वापरली जात होती. पण निवडणूक आयोगापुढे आलेली कागदपत्रे, पुरावे व आमदार-खासदारांचे संख्याबळ विचारात घेऊन एकनाथ शिंदे यांनी केलेला दावा आयोगाने मान्य करीत शिवसेना व धनुष्यबाण शिंदे गटाला दिल्याचे शुक्रवारी रात्री जाहीर केले. महाराष्ट्राची सत्ता गमावल्यावरही उद्धव व त्यांच्या निकटवर्तीयांचा अहंकार कमी झाला नाही, हेच दोन दिवसांत दिसले. मुख्यमंत्रीपदाची झूल गेली तरी ते जमिनीवर आलेच नाहीत.

रोज नुसत्या वल्गना व पोकळ धमक्या यातच ते वेळ घालवत आहेत. १९६६ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या अस्मितेसाठी पक्ष संघटना स्थापन केली. पुढे पक्ष विस्तारासाठी हिंदुत्वाची जोड दिली. भाजपबरोबर युती करून राज्यात काँग्रेस नामोहरम केली. पण मुख्यमंत्रीपदाच्या लोभापायी त्यांच्या पुत्राला आपल्या पिताश्रींनी किती कष्ट उपसले, किती घाम गाळला, शिवसैनिकांनी किती रक्त सांडले, याचा विसर पडला आणि काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीवर बसून मुख्यमंत्रीपदाचा मुकुट मस्तकावर चढवला. महाराष्ट्रातील जनतेला हे मुळीच पटले नव्हते. अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना घरात बसून काय केले, त्याची त्यांनी आता पुस्तिका काढावी म्हणजे महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेला त्यांनी काय काम केले ते समजेल. एकनाथ शिंदे हा नेता शिवसेना संघटनेचा मोठा आधार होता. पक्षातील चाळीस आमदार, पक्षाचे समर्थन करणारे दहा आमदार व तेरा खासदार त्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येतात व उद्धव यांना आव्हान देतात, हे काही एका रात्रीत घडलेले नाही. उद्धव हे पक्षप्रमुख होते, पण सत्ता गेल्यावर ते आपला पक्षही सांभाळू शकले नाहीत. वडिलांनी उभारलेल्या वृक्षाची ते नीट देखभाल करू शकले नाहीत. पक्षातील असंतोष व खदखद ते थोपवू शकले नाहीत. पक्ष संघटनेकडे त्यांनी पुरेसे लक्ष दिले नाही. असंतोष शिगेला पेटला तेव्हाच पन्नास आमदार गुवाहाटीच्या दिशेने निघाले, तेव्हा त्याचेही गांभीर्य त्यांना समजले नाही. उद्धव यांचे निकटवर्तीय बंडखोर आमदारांची गद्दार व रेडे म्हणून टिंगल करीत राहिले. खोके म्हणून त्यांना हिणवत राहिले. हे सर्व नैराश्येतून ते बोलत होते, हे जनतेला चांगले समजत होते. पक्षाची मालकी गेली, पक्षाचे निवडणूक चिन्ह गेले म्हणून आता आदळ-आपट करण्यात काय अर्थ आहे, ही पाळी उद्धव यांनी स्वतःच्या वागणुकीतूनच आणली आहे. स्वार्थ आणि केवळ मातोश्रीतील परिवाराचे हित यातून पक्षाला ओहोटी लागली. माझ्याजवळ तुम्हाला देण्यासारखे आता काही नाही, असे सांगून तुमच्या जीवावर आपण लढतो आहोत, असे सांगणे हे नामुष्कीचे लक्षण आहे. राज्याची सत्ता असताना शिवसैनिकांसाठी काय केले हे कधी सांगू शकतील का? शिवसैनिक म्हणजे आपली कवचकुंडले, त्यांनी रस्त्यावर येऊन लढायचे आणि आता तर पेटवा आयुष्याच्या मशाली, असे सांगत आहेत. ज्यांनी पक्षासाठी पोलीस केसेस अंगावर घेतल्या, ज्यांनी पक्षासाठी दुसऱ्याशी पंगा घेतला, तुरुंगवास भोगला त्यांच्यासाठी काय केले, हे कधी सांगता येईल का? आठ महिन्यांपूर्वी वर्षावरून मातोश्रीवर परतल्यावर अशीच शिवसैनिकांची गर्दी जमवली होती, कोणी हनुमान चालिसा म्हणणार म्हणून तेव्हाही अशी गर्दी आणली होती, आता पक्षाचे नाव व चिन्ह गेले म्हणूनच "चलो मातोश्री' असे आदेश निघाले. त्यातून पुढे काय झाले? या शिवसैनिकांना सत्तेवर आल्यावर कायमचा रोजगार, नोकऱ्या-व्यवसाय दिला असता तर त्यांच्या कुटुंबीयांनी नेतृत्वाला दुवा तरी दिला असता. भावनेच्या आधारावर व शिवसेनाप्रमुखांच्या पुण्याईवर किती दिवस अशी गर्दी जमवता येणार?

निवडणूक आयोगाने शेण खाल्ले असे भाष्य करणे म्हणजे पक्ष नेतृत्वाने पातळी सोडली आहे. गाडीच्या टपावर उभे राहून भाषण केले म्हणजे कॉपी होईल पण शिवसेनाप्रमुख कसे होता येईल? एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता त्यांना चोर म्हणणे, निवडणूक आयोग व अन्य यंत्रणा भाजपच्या बटीक असल्याचे सांगणे, महाशिवरात्रीच्या आदल्या रात्री धनुष्यबाण चोरीला गेला म्हणून टाहो फोडणे, चोरांना लोक मारतील अशी धमकी देणे, ही सर्व भाषा वैफल्यग्रस्त मनोवृत्तीचे द्योतक आहे. बाळासाहेब ठाकरे हे केवळ उद्धव ठाकरे व त्यांच्या घरापुरते मर्यादित करणे हाच त्यांचा अवमान आहे. ते महाराष्ट्रातील सर्व जनतेचे आहेत व देशातील कोट्यवधी घरात त्यांच्याविषयी जनतेला अभिमान आहे. हिंदुहृदयसम्राट ही त्यांची ओळख आहे. मग त्यांना मातोश्रीपुरते मर्यादित का केले जात आहे? यापूर्वी नारायण राणे, छगन भुजबळ, राज ठाकरे, गणेश नाईक यांनी शिवसेनाप्रमुख हयात असताना जय महाराष्ट्र केला होता. पण एकनाथ शिंदे यांनी केलेला जय महाराष्ट्र म्हणजे मातोश्रीवर भूकंप झाला. निवडणूक आयोगापुढे आपण का हरलो, याचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी उद्धव ठाकरे व त्यांचे निकटवर्तीय आयोगावर, एकनाथ शिंदेंवर व भाजपवर तोंडसुख घेत आहेत.

रुद्राक्षाच्या निमित्ताने धार्मिक स्वातंत्र्य पायदळी

मध्यप्रदेशातील सिहोर जिल्ह्यात कुबेरेश्वर धामवर झालेल्या रुद्राक्ष वाटप कार्यक्रमात आणि त्या वाटेने चारपाच भाविकांना प्राणाला मुकावे लागले. भारतीय संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा इथे संकोच होऊन राज्य घटनेने दिलेल्या कलम २५ नुसार दिलेल्या जबाबदारीचे थेट उलंघन या घटनेत झाल्याचे दिसून येते तरीही अद्याप या सोहळ्याचे आयोजक विठ्ठलेश सेवा समिती किंवा भाविकांना निमंत्रित करणारे कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आल्याचे दिसत नाही. संविधानात कलम २५ ते २८ मध्ये धर्म स्वातंत्र्याचा सविस्तर अधिकार आणि त्याचे अर्थ विशद केले आहेत. आपल्या आवडीचा धर्म निवडून त्याचा आचार,प्रचार आणि उपासना करण्याचे स्वातंत्र्य जरी सगळ्यांना दिले असले तरी काही गोष्टींची बंधने घालण्यात आली आहेत.

प्रदीप मिश्रा यांनी आपल्या आश्रमात आयोजित केलेल्या रुद्राक्ष वाटप सोहळ्यात लाखो भाविकांना देशभरातून मोफत रुद्राक्ष घेण्यासाठी निमंत्रित करण्यापूर्वी ज्या बाबींची काळजी आयोजक म्हणून घ्यायला हवी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे लोकांची प्रचंड गैरसोय होऊन त्यात लोकांना प्राणाला मुकावे लागले.

या घटनेत भाविकांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि आयोजनापूर्वी सार्वजनिक सुव्यवस्था उभी करणे यात कसूर झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले असले तरी धार्मिक सुव्यवस्था,नीतिमत्ता आणि आरोग्य यांच्या अधीन राहून हे हक्क दिले आहेत याचा नेमका विसर सिहोरच्या घटनेत रुद्राक्ष वाटप करताना आयोजकांना विसर पडल्याचे लक्षात येते. मुळात रुद्राक्ष वाटप याचा थेट धर्माशी संबंध जोडला जाऊ शकत नाही मात्र जबरदस्तीने तो जोडण्याचा प्रयत्न केला तरी संविधानाने ज्या अटी घातल्या आहेत त्याचे उल्लंघन करून पुढे जाणे हा अपराध समजला जातो.

अलीकडे कोणत्याही धार्मिक आयोजनात गोंधळ झाल्यावर त्यावर टीका केली की आम्हाला संविधान तसा अधिकार देते मग तुम्ही आक्षेप घेणारे कोण ? असा सवाल केला जातो. संविधान निर्मात्यांना कदाचित हा संभाव्य गोंधळ आधीच लक्षात आला असावा म्हणून त्यांनी धार्मिक स्वातंत्र्य देताना काही बाबी पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. धर्मस्वातंत्र्याच्या तीन कलमांमध्येही (२६ ते २८) धार्मिक व सेक्युलर शब्द परस्पर विलग अर्थानेच आले आहेत. "धार्मिक बाधा', "धार्मिक प्रयोजन', "धार्मिक संस्था', "धार्मिकशिक्षण', "धार्मिक उपासना' हे त्यातील शब्दप्रयोग हीच विलगता दाखवून देतात.सेक्युलर बाबींपैकी फक्त एकच बाब अपवाद करून "धर्म' म्हणून पाळण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. २५व्या कलमात पुढील स्पष्टीकरण आले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

सत्यशोधक जलसाकार रामजी हागे पाटील (विठोली)



सतीश जामोदकर
अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ
अमरावती मो.९४२३३७४६७८

कृष्णराव भालेकरांनी १८७२ साली महात्मा जोतीरावांच्या पहिल्या भेटीत मुठेच्या काठी रोकडो बुवाच्या मंदिरात मंडप व स्टेज तयार करुन अज्ञानराव मोठे देशमुख व श्री सत्यनारायण पुराणिक असे दोन उपहास गर्भ वग जोतीराव फुलेंच्या उपस्थितीत सादर केले होते. त्यानंतर महाराष्ट्रात जे सत्यशोधकी जलसे निघाले त्यांचे उगमस्थान कृष्णराव भालेकरांच्या वगात सापडते. बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी त्यांना अज्ञान, अंधश्रद्धा व अस्पृश्यता इत्यादी मधून बाहेर काढण्यासाठी सत्यशोधक जलशाची भूमिका अत्यंत महत्वाची होती.

ओतुरचे भीमराव महामुनी, भइलवाडी भाऊराव पाटील, कासेगावचे तात्याबा पाटील, बेलुरचे शंकरराव पाटील, काले येथील रामचंद्र घाडगे, शिवभर येथील आबासाहेब फाळके, सातारचे जोत्याजीराव फाळके, कोल्हापुरचे बापूराव घाडगे इत्यादी जलसाकाराचे जलसे महाराष्ट्रभर प्रबोधन करीत होते. भीमराव महामुनी या पहिल्या जलसाकाराचा जलसा सर्वप्रथम विदर्भात झाला. तत्पुर्वी विदर्भात हरिचा जलसा म्हणून गुलाबराव नायगावकरांचा जलसा प्रसिद्ध होता. चिखलीचे पंढरीनाथ पाटील यांच्या सहकार्याने जलशाची निर्मिती होत होती. करजगावकर मंडळीसुद्धा जलशाच्या माध्यमातून प्रबोधन करीत होती. जुन्या अकोला जिल्ह्यात व आताच्या नवीन वाशीम जिल्ह्यात समाष्टि असलेल्या मानोरा तालुक्यातील विठोली या गावात रामजी हागे पाटील यांचा सत्यशोधक जलसा प्रसिद्धीला पावला होता. हागे पाटील यांच्या जलशाने मोठ्या प्रमाणात लोकजागृती केली होती. स्वातंत्र्य चळवळीपर्यंत त्यांच्या जशाचा प्रभाव होता.

रामजी हागे पाटील यांचा जन्म ग्राम विठोली, मानोरा-दिग्रस रोडवरील मनोऱ्यापासून अवघ्या दोन किलोमीटरवर असणाऱ्या छोट्याशा खेड्यात, एका कुणबी शेतकरी-शेतमजूर कुटुंबात झाला. त्यांचे वडील भगाजी पाटील हे शेतमजुरीचे काम करीत असत. रामजी पाटील यांचे शिक्षण जेमतेमचं झाले होते. शास्त्री नारोबाजी महाधट पाटील या भागात येऊन गेले होते. पंढरीनाथ पाटलांच्या कार्याचा सुद्धा रामजी पाटलावर प्रभाव पडला असावा. त्यानंतर त्यांनी आपली संपूर्ण ह्यात जलशाचा माध्यमातून बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी घालवली.

१९९८ साली अकोला येथे आठवी सत्यशोधक परिषद झाली. त्या परिषदेला रामजी पाटील उपस्थित होते. त्या परिषदेमध्ये झालेल्या पंधरा ठरावाप्रमाणे रामजी पाटलांना प्रत्यक्ष कार्य गावात केले. या दरम्यान त्यांनी गावात प्राथमिक शाळा काढली. इंग्रजी वर्ग चालवणारी या भागातील ही पहिली शाळा होती. भूताराम तेली महिंद्रे, सूर्यभान इंगोले, बालाजी पाटील, गणाजी मिसाळ यांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे शिक्षणही येथील प्राथमिक शाळेमध्ये झाले.

स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी त्यांनी घरापासूनच सुरुवात केली. त्यांची सून सुगंधाबाई यांचे नाव सर्वप्रथम शाळेत घातले. गिरोली येथील वस्ताद के.एस.कांबळे यांचे शालेय शिक्षण विठोली येथेच झाले. त्यांच्यावर रामजी पाटलाच्या सत्यशोधकी विचारांचा प्रभाव होता.

१९१७ साली खामगाव येथे अ.भा.मराठा शिक्षण परिषद झाली त्या परिषदेमधील राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक विचारांचा प्रभाव कुणबी-मराठा व तत्सम जातींवर पडलेला दिसून येतो. हा काळ बहुजन समाजाच्या प्रचंड मानसिक उलथापालथींचा काळ होता. ब्राम्हणेत्तर सत्यशोधक चळवळीने परमोच्च बिंदू गाठला होता. डॉ. पंजाबरा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाडात ब्राम्हणेत्तर चळवळ जोगत होती. त्या प्रेरणेने अनेक कार्यकर्त्यांनी १९२४-२५ साली वसतीगृहाची स्थापना केली. त्याच दरम्यान विठोलीत रामजी हागे पाटीलांनी सुद्धा बोर्डींग काढले. गरीब, अनाथ, इतर मागासवर्गीय मुलांच्या राहण्याची व शिक्षणाची सोय त्यांनी केली. त्यांच्या घराच्या जागेतच हे बोर्डींग चालू करण्यात आले होते. त्यांची बहीण झांबराबाई यांनी स्वतः बोर्डींगातील मुलांना भाकरी करुन खाऊ घातल्या. यावरुन रामजी पाटील यांचे संपूर्ण घरच याकामी गुंतले होते असे दिसते.

रामजी हागे पाटील यांच्या सत्यशोधकी जलशाच्या प्रभावाने विठोलीत बरीच वर्षेपर्यंत धार्मिक विधी ब्राम्हणांच्या हातून होत नव्हते. तसेच गावात नवरदेव पारावर जात नव्हता. पाटलांनी स्वतःच्या घरातील देव व महालक्ष्मीचे मुखवटे घराच्या भिंतीच्या पायात पुरवून टाकले होते. यावरून ते किती कट्टर सत्यशोधक होते. याचा अंदाज येतो. त्यांच्यावर कबीरांच्या विचारांचाही प्रभाव होता. त्यांच्याजवळ कबीरकृत पदे, दोहरे व कबीर बिजक मूल अशी पुस्तकेही होती.

त्यांच्या जलशाचे कार्यक्रम आजूबाजूच्या परिसरात होत होते. सोयजना, कोंडोली, वगोली व सोमठाणा इत्यादी गावातसुद्धा त्यांच्या जलसाचे प्रयोग होत होते. त्यांच्या जलशाला मानोरा, मंगरूळपीर व कारंजा भागातून मागणी येत होती. धावंडा येथील आप्पाराव नावाचा कलाकार त्यांच्या जलशात स्त्री पात्र करायचा. तेरवी,पिंडदान व इतर धर्मभोळ्या रुढीपरंपरा यांना त्यांनी कडाडून विरोध केला. जलशाच्या माध्यमातून त्यांनी बहूजन समाजाला जागृत करण्यासाठी कार्य केले. रामजी पाटील यांच्या कार्याचा प्रभाव आजही विठोलीत व परिसरात दिसून येतो. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून गावकऱ्यांनी त्यांचा व भूताराम तेली (महिंद्रे) यांचा पुतळा जि.प. प्राथमिक शाळेत उभारला होता.

आज मात्र रामजी पाटील यांच्या सत्यशोधकी जलशाचे पदे लिखीत स्वरूपात मिळत नाही. त्याचा शोधक घेऊनही ते सापडत नाही. याची खंत आहेच. शिवाय त्यांचा पुतळा ज्याठिकाणी उभारला होता. त्याची ही हेळसांड झालेली दिसून येते. यावरून बहुजन समाजाला आजही आपल्या प्रेरणांची योग्य तऱ्हेने जोपासना करता येत नाही, असे दिसून येते. अक्षर साहित्याचे महत्व अज्ञानापोटी त्यांच्याजवळ आजही नाही. कालही नव्हते. याचे कारण म्हणजे या व्यवस्थेने त्यांचे महत्वच त्याला कळू दिले नाही. हे अशा घटनावरुन व्यक्तीचरित्रावरुन स्पष्ट होते.

शिवकालीन काळ आणि आज

भारतीय भूमीत राजे-महाराजे खूप झालेत. परंतु त्या सर्व राज्यांची जयंती किंवा मयंती कोणी साजरी करतांना दिसत नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सर्व भारतभर लोकोत्सव म्हणून साजरी केल्या जाते. तसेच वर्तमान लोकशाही शासन व्यवस्थेततील शासन कार्यकर्त्यांना सुद्धा त्यांचे शासन-सत्ता संपली की कोणी त्यांचे समरण करतांना दिसत नाही. असे का? त्याचे कारण काय असावे? यांचे दोन-तिन पैलू या लेखाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. तसें ते दोन-तिन पैलूत सामावणारे व्यक्तिमत्व नाहीत. कारण त्यांनी प्रजेला तळ हातावरील फोळ्याप्रमाणे जपलं.

ज्या काळात स्त्रियांना नर्तकी म्हणून जणानखान्यात डांबले जायचे त्या काळात छत्रपती शिवाजी महाराज परस्त्रीला मातेसमान मानत. रांझा गावच्या वतनदाराने गरीब शेतकऱ्यांच्या पोरीची दिवसा ढवल्या विटंबना केली. ही वार्ता महाराजांना कळतच वतनदाराला मुसक्या बांधून दरबारात हजर केल्या गेलं आणि त्याचे हातपाय तोडायची शिक्षा फक्त दिल्या गेली नाही तर ती तत्काळ अंमलात आणल्या गेली. आज लोकांनी निवडून दिलेल्या सत्ताधाऱ्यांच्या सत्तेत दिवसा ढवल्या स्त्रियांचे खून-बलात्कार होत असतांना शासन व न्यायालय डोळ्यावर पट्टी बांधून आहे. जात-धर्म, गरीब-श्रीमंत असं वर्गवारी पाडून होणाऱ्या अन्यायची दखल घेतल्या जाते. तरीसुद्धा महिलांना न्याय मिळेपर्यंत आरोपी राजरोसपाने सत्तेत वावरतांना दिसतात. हा शिवरायांच्या काळात आणि आताच्या वर्तमान सत्ताधाऱ्यांच्या काळात फरक असल्यामुळे शिवरायांचा गजर व जागर होतो.

महाराष्ट्राचा मुलुख म्हणजे शेतकऱ्यांचा मुलुख. भारत देश म्हणजे शेती प्रधान देश. अलीकडे तो जातीप्रधान आणि श्रीमंतांचा इंडिया झाला, तो भाग वेगळाच. बळीराजाची-शिवरायांची परंपरा असलेल्या या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असतांना आपण जेव्हा विचार करतो तेव्हा तेव्हा हा? का घडत आहे असा प्रश्न निर्माण होतो. शिवराय शेतकऱ्यांचे कैवारी होते. मावळ खोऱ्यातील सर्व जमीनीची मोजणी करून त्यांचे सात-बारा बनवून घेतले. ज्यांच्याकडे जमिनी आहेत त्यांना खत, बी- बयाणे, दिले तर ज्यांना जमिनी नव्हत्या त्यांना कसायला जमिनी दिल्या. आणि पिकविलेला माल उत्तम किंमतीत विकण्याची हमी दिली. शेतकऱ्यांनी मधल्या दलालांना खंडणी देऊ नये अशी अज्ञाच काढली होती. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी स्वतःच्या सैनिकांना सुद्धा शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला सुद्धा धक्का लागता कामा नये. असे आदेश दिले होते. वर्तमानात मात्र सत्ताधारी उद्योजकांचे बँक बॅलेन्स वाढवण्याकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या घश्यात टाकण्याचे कायदे बनवत आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांची किंमत वाढली की महागाई वाढली म्हणून बोंबलल्या जाते. शेत मालाच्या किंमती खाली पाडून शेतकऱ्याला दररोज गाडण्याची पॉलिसी बनवल्या जात आहे. शेतकऱ्याला त्याच्याच देशात त्याला देशद्रोही व आतंकवादी ठरविल्या जात आहे. देशाच्या राजधानीत प्रवेश करण्यापासून त्याला अडविल्या जात आहे. याउलट परिस्थिती शिवकाळात होती; म्हणून चारशे वर्षानंतर सुद्धा महाराजांची जयंती साजरी केल्या जात आहे. त्यांचे समरण केल्या जातो. त्यांचा उदो-उदो होतो. शेतकऱ्यांच्या, महिलांच्या, कष्टकरी, श्रमकरी, दिन-दलितांच्या उद्धारासाठी आपल्यातला-तुमच्यातला-माझ्यातला शिवराय जागा होणे गरजेचा आहे.

राजकीयः-शिवकाळात वतन सोडुन तसेच औरंगजेबाची, आदिलशाहीची किंवा निझामशाहीची चाकरी सोडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मदत करायला बहुतेक मराठा सरदार तयार नसत. एवढे ते स्वार्थी आणि भित्रे बनलेले होते. तिच परिस्थीती आज दिसत आहे. आज कोणीही मंत्रीपद किंवा आमदारकी-खासदारकी सोडून वा भटजी-शेटजी-लाटजीचा पक्ष आणि जहागीरी सांभाळणारे पक्ष सोडून मराठा-कुणबी-ओबीसी बहूजन समाजालवा संघठीत करण्याचे प्रयत्न करतांना कुणीच दिसत नाही किंवा समाजाच्या उन्नतीसाठी-भल्यासाठी लढणाऱ्या संघंठनांना मदत करतांना दिसत नाही. त्यामुळेच मराठा-ओबीसी-बहूजनातील शेतकरी- विद्यार्थ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे.

हे परिवर्तन शिव-फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आजचा युवक करु शकतो. कारण युवकच क्रांतीमधील प्रथम क्रमांकाचा सैनिक असतो. युवक समाज व देशाचे कल्याण करण्यात अग्रेसर असू शकतो तसाच देश व समाजाशी गदारी करणाऱ्यांचे वाटोळे करण्यात सुद्धा अग्रेसर असतो. मग तो आपला असला तरी कशाची भिड बाळगत नाही. जगतगुरु तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगायचे झाल्यास,

*मायबापाहूनी बहु मायावंत,
करु घातपात शत्रूहूनी,
अमुत ते काय गोड आम्हापुढे,
विष ते बापुडे कडू किती,
तुका म्हणे आम्ही अवघेची गोड,
ज्याचे पुरे कोड त्याचे परी.*

स्वराज्य स्थापन्यात प्रस्थापित सरदांरांनी नव्हे तर शेतात राबणार्या तरुण मावळ्यांनी जिवाची बाजी लावली....

असा लोकमान्य लोकराजा छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

अनिल भुसारी, तुमसर जि. भंडारा
८९९९८४३९७८

'कुळवाडीभूषण' छत्रपती शिवरायः जयंती उत्सव

शिवरायांचा जन्मोत्सव अर्थात शिवजयंती महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साजरी होत असते. किंबहुना शिवजयंती महाराष्ट्रातील प्रमुख सण उत्सवाप्रमाणे साजरी होत असताना शिवरायांची लोकप्रियता फार उच्च दर्जाची असल्याशिवाय असं होणं शक्य नाही. बहुजन समाजाची अब्राम्हणी परंपरा अजूनही जनमानसात खोलवर रुजली गेली आहे, त्यामुळेच लोकोत्सवाच्या माध्यमातून तिची अभिव्यक्ती होत असते. इतकी प्रचंड लोकप्रियता असलेल्या आणि शतकानुशतके लोकांच्या काळजावर अधिराज्य गाजवणाऱ्या शिवरायांबद्दल अवमानकारक टीका टिप्पणी का व्हावी? कोण करतात असले समाजद्रोही उद्योग? हे समजून घेणेही महत्त्वाचे ठरेल.

छत्रपती शिवरायांची बदनामी करणारी वक्तव्ये एका मागून एक बाहेर येत असताना छत्रपती शिवरायांचा अपमान करणाऱ्यांचा समाचार घेणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढू लागलेली दिसते. सत्ताधारी असो वा मातब्बर मंत्री संत्री शिवरायांचा अपमान करणाऱ्यांचा फाटक्या माणसाकडूनही मोठ्या प्रमाणावर निषेध व्हायला लागला. विशेष म्हणजे छत्रपती शिवरायांची हिंदवी स्वराज्याचे जनक, मधर्मरक्षकफ अर्थात मुस्लिमांचा कट्टर कर्दनकाळ अशी प्रतिमा ज्यांनी उभी केली त्याच कम्पुतील राजकीय अभिजन छत्रपतींबद्दल वादग्रस्त बोलू लागलेले दिसतात.

जेन्स लेन प्रकरणी शिवरायांची बदनामी करून त्यांनी शिवरायांचा अवमान केल्यानंतर महाराष्ट्रात प्रचंड जनक्षोभ उफाळून आलेला दिसला. जेम्स लेनला शिवरायांबद्दल ज्यांनी माहिती पुरवली त्यांच्यावर, त्यांच्या विचारधारेवर आणि पुणेस्थित भांडारकर संशोधन संस्थेवर त्यांचा रोष व्यक्त झालेला महाराष्ट्राने बघितला. शिवरायांच्या बदनामीकारांना चोख उत्तर देण्यासाठी शिवछत्रपतींच्या अब्राह्मणी कार्यकर्तृत्वाची बाजू पुढे मांडणारी वायय निर्मिती होऊ लागली. पुरंदरे वगैरे सारख्यांनी शिवरायांची मगोब्राह्मणप्रतिपालक, इस्लामद्वेष्टे म्हणून उभी केलेली प्रतिमा तपासण्याची नव्याने ऐतिहासिक साधने, संशोधने, संदर्भ, चिकित्सा पद्धती पुढे येऊ लागली. आणि शिवरायांच्या 'कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज' या नाम ोल्लेखानुसार शिवराय लोकांपर्यंत पोहोचू लागले.

दुसऱ्या बाजूने जेम्स लेननंतरही महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हिंदुत्वाचा कंठशोष करणाऱ्यांची राजकीय सत्ता आली. आणि शिवरायांबद्दल त्यांच्या अनेक नेत्यांच्या तोंडून वादग्रस्त विधाने येऊ लागली. अवमानकारक विधाने येऊ लागली. छत्रपती शिवरायांबद्दल अवमानजनक टिप्पणी केल्यावरुन अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने निषेध होत असताना शिवरायांवर जीवापाड प्रेम करणारी जनता छत्रपतींचा अवमान फारकाळ सहन करू शकणार नाही. शिवराय कुणाचे? शिवरायांचे खरे शत्रू कोण? यावर रणकंदन होऊन शिवरायांची 'कुळवाडीभूषण' अशी प्रतिमा अजून सतेज होईल, एवढे मात्र नक्की!

सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीतील विद्वत प्रचूर चरित्रकार गुरुवर्य श्री कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी शिवचरित्र लिहून शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू प्रकाशात आणले. सरस्वती पब्लिकेशन प्रा. लि. ने छत्रपती शिवाजी महाराज हे दीर्घचरित्र नुकतेच प्रकाशित केले. त्यात प्रकाशक म्हणतात, "गुरुवर्य श्री कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी उपलब्ध सर्व साधनांचा साक्षेपाने अभ्यास करून आधुनिक कालखंडातील मराठीतील पहिले शिवचरित्र १९०६ साली लिहिले. त्याकाळी व त्यानंतरच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक चरित्रे लिहिली गेली. परंतु केळुसकरांनी लिहिलेले शिवचरित्र हे सखोल, विस्तृत व वस्तुनिष्ठ दृष्टीने लिहिले असल्यामुळे ते एकमेवाद्वितीय असेच असून हे चरित्र म्हणजे इतिहासाचा एक अक्षय ठेवा आहे, असे म्हणावे लागेल." या चरित्रात केळुसकरांनी अनेक बखरकारांच्या बखरी, प्रा. जदुनाथ सरकार, ग्रांट डफ, वि.का.राजवाडे, किंकडे, मोडक, विलकीज, मनुची, स्कॉट बेरिंग व बुंदेल इ.चे ग्रंथ. ईस्ट इंडिया कंपनीचा पत्रव्यवहार व कागदपत्रे इ. साधनांतून सूक्ष्माती-सूक्ष्म पैलू शिवचरित्रात नोंदविले. या शिवचरित्राबद्दल डॉ. रमेश जाधव म्हणतात की, "शिवचरित्रकारांनी या शिवचरित्रामध्ये प्रथमच शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या उद्योगात दादाजी कोंडदेव व समर्थ रामदास यांचा काहीच वाटा नव्हता. तसेच समर्थ रामदास आणि शिवाजी महाराज यांची पहिली भेट १६७३ साली झाली. हे सत्य त्यांनी निर्भीडपणे मांडले." त्यामुळे टुकार शिवचरित्रकारांचे वाईट मनसुबे समजण्यासाठी मोलाची मदत होते.

आदरणीय केळुसकर लिखित शिवचरित्र येण्यापूर्वी महात्मा जोतीराव फुलें यांनी छत्रपती शिवरायांवर पोवाडा लिहून शिवछत्रपती हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील जनतेचे नायक होते, हे त्या पोवाड्यातून उभ्या केलेल्या कुळवाडीभूषण या प्रतिमेमुळे अस्सल शिवराय समोर येतात.

अठरापगड जातीचे मावळे शिवरायांच्या सोबत स्वराज्यासाठी जीवाची बाजी लावतात, ते स्वराज्य कशा प्रकारचे असावे? गोब्राम्हण प्रतिपालक की जनस-ुराज्य? "शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका!" अशी शिकवण ज्यातून मिळते ते शिवराय महात्मा फुले यांच्या भूमिकेतून दिसतात. या देशातील धर्ममार्तंडांनी त्यांचे कान भरून, परधर्मद्वेष्टे म्हणून शिवरायांना इस्लामविरोधी राजा दाखवण्याचा प्रयत्न केला तो तपासून पाहण्याची दृष्टी महात्मा फुलेंकडून मिळाली. केळुसकरादिकांनी लिहिलेल्या चरित्रांतून ती प्रवाहित झाली. शिवराय हे केवळ मुस्लिमविरोधी अथवा राजकीय सत्तेविरोधी नव्हते. त्यांचा लढा जुलमी मूल्यवस्थेविरुद्ध होता. त्यांचा लढा केवळ शस्त्रास्त्रांच्या लढाया जिंकण्यापुरता मर्यादित नव्हता, हे परमानंद यांनी संस्कृत मधून लिहिलेल्या शिवभारत या ग्रंथाच्या आधारे स्पष्ट होते.

'शिवरायः संस्कार आणि शिक्षण' या ग्रंथात डॉ. आ. ह.साळुंखे सर म्हणतात, शिवराय विलक्षण बुद्धिमान होते हे परमानंदांनी वेगवेगळ्या प्रकारे स्पष्ट केले आहे, ते अफजलखानाला भेटण्यासाठी गेले तेव्हा त्याचे वर्णन करण्यासाठी परमानंदांनी वापरलेला 'अनल्पधी' हा शब्द माझ्या काळजाला स्पर्श करुन गेला आहे. आणि मस्तकामध्ये कोरला गेला आहे. शिवराय अफजलखानाशी केवळ हातांनी, केवळ शरीराने वा केवळ शस्त्रां

प्रतापगड यात्रेत लाखो भाविकांनी घेतले भोले शंकराचे दर्शन

प्रतापगडावर जल्लोसात झाला हर हर महादेवाचा गजर

गोंदिया:– ४०४ वर्षाची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या राष्ट्रीय एकात्मतेचे हिंदू–मुस्लीम सलोख्याचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या,धर्मनिरपेक्षतेचा संदेश देणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील राज्यात व देशात प्रसिद्ध असलेल्या प्रतापगडच्या ऐतिहासिक यात्रेला आज १८ फेब्रुवारी रोज शनिवारपासून महाशिवरात्रिला प्रारंभ झाला आहे. यात्रेदरम्यान राज्यातील व परप्रांतीय लाखो भाविकांनी प्रचंड उत्साहात हजेरी लावून हर हर महादेवाचा नारा दिला. प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या प्राचीन शिव मंदिरात लाखो भाविकांनी सकाळपासूनच दर्शन घेतले व मोठ्या जल्लोषात हर हर महादेवाचा नारा गेल्या तीन वर्षानंतर या प्राचीन मंदिराने अनुभवला. २३ फेब्रुवारी पर्यंत यात्रा सुरू राहणार आहे. मात्र कोविड १९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेल्या ३ वर्षांपासून ही यात्रा जिल्हा प्रशासनातर्फे रद्द करण्यात आली होती. कोरोना काळात महाशिवरात्रिची ऐतिहासिक यात्रा रद्द झाल्याने भाविकांची घोर निराशा झाली होती. त्याची कसर तीन वर्षानंतर लाखो भाविकांनी आज काढली. हे येथे उल्लेखनीय आहे. प्रतापगड यात्रेत येणाऱ्या भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. १६ फेब्रुवारी रोज गुरुवार पासूनच भाविकांचे पोहे पोहा चालला महादेवा हर हर महादेव अशा घोषणा देत प्रतापगडच्या दिशेने जथेच्या जथे आगे कूच करीत आहेत. भाविकांच्या व्यवस्थेसाठी जिल्हा प्रशासनासह तालुका प्रशासन ही सज्ज असल्याचे दिसून आले.

पायथ्यापासून ७ किलोमीटर उंचीवर प्रतापगड किल्ल्याच्या कड्यात एका दरीत स्थापित असलेल्या प्राचीन भगवान शंकराचे मंदिरावर लाखो भाविक मोठ्या श्रद्धेने प्रचंड गर्दीत, मुक्या उत्साहात आभार वृद्धांपासून तर युवकांपर्यंत महिला पुरुष मोठ्या श्रद्धेने शिव मंदिराकडे जाताना दिसून आले. या मंदिरात नवसतर काही नी नवस कबूलतांना दिसले. पूजा अर्चना करीत व आपले सुखदुःख भोळ्या शंकराच्या कानी घालतांना वृद्ध भाविकांपासून महिला पुरुष युवक यांनी प्रचंड गर्दी केली होती.

प्रतापगडचे शिवमंदिर,मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेले ख्वाजा उस्मान गणी हारुनी दर्गा येथे भाविकांनी हजेरी लावून दर्शन घेतले. भोले शंकराच्या दर्शनानंतर ख्वाजा उस्मान गणी हारून यांच्या मशिदीत जाऊन अनेक हिंदू बांधवांनी मोठ्या श्रद्धेने चादर चढवली. अशाप्रकारे हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन यावेळी लाखो भाविकांनी घडविले.

येथून दर्शन घेतल्यानंतर शरणाथी तिबेटियन वसाहतीतील बुद्ध विहार, नजीकचे इटीयाडोह धरणाला भेट देऊन काही भाविकांनी पर्यटनाचा आनंदही लुटला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले, माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी यात्रेला भेट दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी तसेच काही सामाजिक स्वयंसेवी संस्थांनी या ठिकाणी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते तर आरोग्य विभागाच्या वतीने भाविकांचे आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिबिरे लावली होती.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने शिवजयंती निमित्त ८० रक्तदात्यांनी केले रक्तदान

गोंदिया:– शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांच्या तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अंतर्गत रक्तदान अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानात विविध ठिकाणी ८० रक्तदात्यांनी रक्तदान करुन सामाजिक बांधिलकी जोपासली.

महाविद्यालय परिसरात अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतीमा पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर रक्तदानाविषयी जनतेमध्ये जागृती करण्यात आली. वसतिगृह व महाविद्यालय परिसरामध्ये महाराजांच्या पालखी समवेत अभियानाच्या पोष्टरसह प्रभातफेरी काढण्यात आली.

या प्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदियातर्फे तीन वेगवेगळ्या ठिकाणी रक्तदान शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. पीएसएम हॉल बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच सडक अर्जुणी येथील रक्तदान शिबिरामध्ये ४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले व गोरेगाव या गावामध्ये ०७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या सर्व रक्तदात्यांना शासनातर्फे प्रमाणपत्र देण्यात आले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे यांनी महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांना मार्गदर्शनपर भाषण केले. डॉ. चंद्रशेखर चांदेकर, सेवानिवृत्त प्राध्यापक, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांना प्रमुख वक्ते आंमत्रित करण्यात आले होते. त्यांनी कार्यक्रमप्रसंगी सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी जिल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, डॉ. एन. जी. राऊत, नेत्रविभागप्रमुख, डॉ. प्रविण जाधव, सहयोगी प्राध्यापक, दिलिप गेडाम, सहयोगी प्राध्यापक, डॉ.अर्चना रंदाळे, सहयोगी प्राध्यापक व श्रीमती सुरेखा व्याहाडकर, सहायक अधिसेविका हे मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. मनू शर्मा, सहायक प्राध्यापक, डॉ. संजय माहुले, उप वैद्यकीय अधिक्षक, डॉ. पल्लवी गेडाम, सहायक प्राध्यापक तथा रक्तकेंद्र प्रमुख, डॉ. पुजा बोंबार्डे, वरिष्ठ निवासी, विकृतीशास्त्र विभाग विलास डाहारे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, हरिचंद्र कटरे, वरिष्ठ लिपिक, शिवम घारड, लघुलेखक सचिन ढोले, शैलेंद्र बनसोड आणि महाविद्यालयीन विद्यार्थी व परिचर्या प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

वैद्यकीय शिक्षण विभागाचे वतीने गिरीश महाजन, मंत्री वैद्यकीय शिक्ष सचिव डॉ. अश्विनी जोशी, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले व डॉ. विवेक पाखमोडे तसेच रामेश्वर नाईक यांचे मार्गदर्शनानुसार संपुर्ण अभियान राबविण्यात येत आहे.

छत्रपतींच्या कृति अंगीकृत करा-पोलीस अधिक्षक पिंगळे

गोंदिया:– छत्रपतींचा इतिहास न विसरणारा आहे. शिवचरित्राचे वाचन करा.ती आजच्या जिवनात काळाची गरज आहे. छत्रपतींचे नुसते फोटो लावुन व जयंती साजरी करून चालणार नाही तर त्यांची कृति प्रत्यक्षात जिवना मध्ये आणून आदर्श अंगीकृत करा,असे प्रतिपादन पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी केले.ते स्थानिक मनोहर चौक येथे श्री शिव छत्रपती मराठा समाजाव्दारे १९ फेब्रुवारी रोजी आयोजित शिव जयंती समारोहात बोलत होते.याप्रसंगी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण व निखिल पिंगळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे होते.पाहुणे म्हणून नगर परिषदचे मुख्याधिकारी करण चव्हाण, कार्यकारी अभियंता अनंत जगताप,वसंतराव बढे, अँड.राजा बढे, शहर पोलिस निरिक्षक चंद्रकांत सुर्यवंशी, दामोदर अग्रवाल,व्दारका सावंत, माधुरी नासरे, भावना कदम, माया सणस, राजु तुपकर आदींची उपस्थिती होती.प्रसंगी छत्रपती शिवाजींचा पुतळा दान करणारे दिपक, नारायण,शिला या सावंत कुटुंबीयांचा तसेच नगर परिषद अभियंता अनिल दाते, आर्किटेक्ट विवेक भालेराव, शशीकांत चवरे, शुटींग गोल्ड मेडलीस्ट आदित्य जगताप, दिव्यांग धर्म काळे यांचा शाल व श्रीफल देवुन सत्कार करण्यात आला.जिल्हाधिकारी यांनी शिवाजी महाराजांचा जिवन चरित्रावर प्रकाश टाकून मनोहर चौक येथे प्रस्तावित शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्राणप्रतिष्ठा काही त्रुटी साठी थांबली असुन त्रुटींची पुर्तता लवकरच केली जाणार असल्याचे म्हणाले.

सावित्रीबाई व फातिमा शेख यांच्यामुळे महिलांना समाजात हक्काचे स्थान:रविकांत बोपचे

तिरोडा:– पूर्वीच्या काळात समाजात महिलांना दुय्यम स्थान होते. चुल आणि मुल ह्या गोष्टींमध्ये महिलांचे जीवन निघून गेले. मात्र जाती पाती, चालीरीती व रुढी परंपरावर मात करत सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. यामुळे आज महिला आपल्याला सर्वच क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी स्त्री शिक्षणा करिता घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे आज महिलांना समाजात हक्काचे स्थान मिळालेले आहे, असे प्रतिपादन राकाँचे युवा नेते रविकांत बोपचे यांनी केले.

तालुक्यातील डाकराम सुकळी येथे आयोजित महिला मेळाव्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्षपदावरुन तेबोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन जि.प.सदस्य जगदीश बावनथडे यांनी केले. याप्रसंगी माजी जि.प.उपाध्यक्ष मदन पटले, पंस सदस्य कविता सोनेवाने, तुंडीलाल शरणागत, सरपंच आय.जी.पटले, आशा बिसेन, रवि पटले, जितेंद्र जांभुळकर,राज सोनेवाने, सरपंच सुनिल मेश्राम, उपसरपंच संदीप कुर्वे, चंद्रशेखर बिसेन, प्रमिला शेंडे, कल्पना उके, रुपाली राणे, पोमेश्वर बावनकर, हर्षवर्धन मेश्राम आदिंसह महिला भगिनी व गावकरी उपस्थित होते.

प्रतापगड यात्रेत एका महिला भाविकेचा मृत्यू

गोंदिया: प्रतापगड यात्रेत नवेगावबांध येथील प्रभा कुंभरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुखद घटना यात्रेत घडली.

नवेगावबांध येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नीलकंठ कुंभरे यांच्या पत्नी प्रभाबाई वय ५५ वर्षे यांचे आज प्रतापगड यात्रेत दुःखद निधन झाले. त्या ग्रामपंचायत सदस्य विजय कुंभरे यांच्या मातोश्री आहेत. यात्रेदरम्यान एखाद्या भाविकांचा मृत्यू व्हावा. ही प्रतापगड यात्रेतील पहिलीच घटना आहे, असे सांगितले जाते. मृतक प्रभा ह्या प्रतापगड यात्रेत आल्या होत्या.

प्रतापगड यात्रेत सहभागी झाल्या. त्या वर गडावर चढत होत्या. वाटेत त्यांच्या लहान मुलाच्या दुकानात विश्रांती घेतली. पुढे प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या प्राचीन शिव मंदिरात श्री भगवान शंकराचे दर्शन घेण्यासाठी जाण्यासाठी त्या उभ्या होत्या.

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)
ग्रामपंचायत कार्यालय धाबेटेकडी आदर्श पंचायत समिती अर्जुनी/मोर.

जावक क्रमांक:–२१८
दिनांक :–२०/०२/२०२३

ह्या सुचने द्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते कि मासिक सभा ठराव क्रमांक ८/३ दिनांक १३/०७/२०२२ अन्वये ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ. येथे जलजिवन मिशन अंतर्गत प्रस्तावित धाबेटेकडी आ. येथे **१) जलजिवन मिशन अंतर्गत १०० टक्के कुटूंबाना नळ जोळणी करणे** चे कामे करण्याकरिता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब–१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २०/२/२०२३ ते दि.२८/०२/२०२३ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीस च्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक २८/०२/२०२३ ला दुपारी ठीक ०३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

सदर निविदा हि दिनांक ०१/०३/२०२३ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितांसमोर उघडण्यात येईल.

अ.क्र.	कामाचे स्वरूप	कामाची अंदाजित किंमत	नमुना ७ निविदा फार्मची किंमत	निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम १%	निविदा स्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम २%	बिलातून कपात करण्यात येणारी सुरक्षा ठेव रक्कम २%	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचे वर्ग
१	**जलजिवन मिशन अंतर्गत १०० टक्के कुटूंबांना नळ जोडणी करणे**	७१८१२०/–	१०००/–	७१८१/–	१४३६२/–	१४३६२/–	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत

अटी व शर्ती:–१) सदर बांधकाम निविदेकरिता कोरे निविदा ग्रामपंचायत कार्यालयात निविदा किंमत भरून कार्यालयीन वेळेत मिळेल.२) कंत्राटदाराचे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण व जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र, व्यवसाय प्रमाणपत्र, वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. ३) इतर अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर बघावयास मिळतील.

ग्रामसेवक
ग्रा.पं.धाबेटेकडी/आ.

सरपंच
ग्रा.पं.धाबेटेकडी/आ.

ग्रामपंचायत कार्यालय वडेगांव/बंध्या, पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया
निविदा सुचना

जा.क्र.६ दि.२२/२/२३

निविदा क्र.१ जा.क्र.–६ ग्रा.पं.वडेगांध/बंध्या. दिनांक २२/०२/२०२३ ग्रामपंचायत वडेगांव/बंध्या.पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे १५ वा वित्त आयोग सन २०२१–२०२२ व सन २०२२–२३ अंतर्गत मंजूर खालील विवरणातील कामाचे बांधकामाची ई–निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फार्मची किंमत	अनामत रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	अंगणवाडी इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी मौजा बारव्ही	२२०००००/–		१२००/–	६ महिने
२	अंगणवाडी इमारत दुरुस्ती मौजा वडेगांव/बं.	२८०००००/–		२८००/–	६ महिने
३	हात पंप ओटा बांधकाम करणे युनिट–३	६००००/–		६००/–	६ महिने
४	शौचालय व मुतारी दुरुस्ती जि.प.शाळा अंभोरा	१६५०००/–		१६५०/–	६ महिने
५	शौचालय व मुतारी दुरुस्ती जि.प.शाळा वडेगांव/बं.	१८००००/–	५००/–	२८००/–	६ महिने
६	आवार भिंत बांधकाम ग्रा.पं.वडेगांव/बं.	३६७०००/–		३६७०/–	६ महिने
७	पेविंग ब्लॉक बसविणे ग्रा.पं.परिसर वडेगांव/बं.	२७५०००/–		२७५०/–	६ महिने
८	शासकीय विहीरीला ओटा बांधकाम मौजा चिचटोला	४००००/–		४००/–	६ महिने

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक २२/०२/२०२३ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २७/०२/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय वडेगांव/बं.येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व फार्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल.२) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २२/०२/२०२३ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २७/०२/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय वडेगांव/बं.येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत वडेगांव/बं.येथे मासीक सभेत उघडण्यात येईल. ४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत वडेगांव/बंध्या

सरपंच
ग्रामपंचायत वडेगांव/बंध्या

महाराष्ट्र शासन | आज़ादी का अमृत महोत्सव | G20

छत्रपती शिवाजी महाराज जयंती
१९ फेब्रुवारी

॥ शिवरायांच्या सर्वसमावेशक राज्य कारभाराचा वारसा पुढे नेऊ या ॥

श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव

किल्ले शिवनेरी येथे १८ ते २० फेब्रुवारी २०२३ या कालावधीत जन्मोत्सवाचे भव्य आयोजन

प्रमुख आकर्षण : 'महाशिवआरती', 'जाणता राजा' महानाट्य ● शिवकालीन गाव ● शिववंदना ● 'मराठी बाणा' कार्यक्रम ● स्थानिक पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रम ● महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिबीर ● स्पर्धा ● सहली ● कॅराव्हॅन पार्क ● बचतगटांची उत्पादने ● खाद्यपदार्थांची ३०० पेक्षा जास्त दालने

लाल किल्ला, आग्रा येथे शिवजयंती कार्यक्रम

● महाराष्ट्र शासन व अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आग्रा येथील लाल किल्ला परिसरात प्रथमच शिवजयंतीनिमित्त भव्य आयोजन ● शिवजन्माचे नाट्यरूप सादरीकरण ● महाराजांच्या आग्रा येथील पराक्रमाचे सादरीकरण यांसह विविध आकर्षक कार्यक्रम ● डिजीटल माध्यमांतून जगभरातील शिवप्रेमी अनुभवणार हा आनंदसोहळा, कार्यक्रमाचे आयोजन व प्रसारण – दि. १८ व १९ फेब्रुवारी २०२३

राज्यगीताचा स्वीकृती सोहळा

● छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून कविवर्य राजा बढे लिखित 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताचा 'राज्यगीत' म्हणून स्वीकृती सोहळा
● राज्यगीतीची लिंक https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध

शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

मनरेगा योजनेत जिल्ह्याचे११४ टक्के उद्दिष्ट पूर्ण

गोंदिया : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गोंदिया जिल्हयात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १ एप्रील २०२२ पासून आतापर्यंत एकुण २१४ कोटी ५१ लाख २८७ रुपये निधी खर्च झाला असून त्यामधून ५८ लक्ष ४ हजार मनुष्य दिवस निर्मिती झालेली आहे. ५०.६८ लक्ष मनुष्य दिवस निर्मितीचे उद्दिष्ट असतांना गोंदिया जिल्ह्यात आज अखेर ११४.५२ उद्दिष्ट साध्य झाले आहे. या आर्थिक वर्षात १ लाख ७२ हजार ३८३ कुटूंबांना रोजगार पुरविण्यात आला आहे. त्यापैकी ६ हजार ३०३ कुटूंबांना शंभर दिवस रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

जिल्ह्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक लाभामध्ये सिंचन विहिर, गुरांचा गोठा, शौचालय बांधकाम, घरकुल बांधकाम, शेळ्यांचा गोठा, कुक्कुटपालन शेड, नॉडेप खत, गांडूळ खत निर्मितीसाठी टाकी तसेच पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी शोष खड्डे इत्यादी कामांचे नियोजन करुन आर्थिक वर्षात लेबर बजेटच्या लक्षांक ५० लक्ष ६८ हजार मनुष्य दिवस नुसार ५८ लक्ष ४ हजार मनुष्य दिवस

उद्दिष्ट साध्य केले आहे.

एकंदरीत जिल्ह्यात मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये मोठया प्रमाणात विकासाचे कामे उदा. मातीबांध, पांदन रस्ते, सिंचन विहिरी, रस्ता दुतफा वृक्ष लागवड, भातखाचर, शौचालय, नाला सरळीकरण, तलावातील गाळ काढणे, तलावाचे खोलीकरण, शेतळे, वनतळी, मैदान सपाटीकरण करणे, मातोश्री ग्रामसमृध्दी शेत व पांदण रस्ते इत्यादी कामे होत आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्ह्यात एकूण ८ हजार २७४ कामे सुरु करण्यात आली असून त्यापैकी ०१ हजार ६५७ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात ५०.६८ लक्ष मनुष्य दिवस निर्मितीचे उद्दिष्ट देण्यात आले असून, लेबर बजेटचे उद्दिष्ट प्रमाणे आज अखेर ११४.५२ उद्दिष्ट साध्य झाले आहे. जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कामाचा नियोजन आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये कामे सुरु करुन जास्तीत जास्त कुटुंबांना शंभर दिवस रोजगार उपलब्ध करुन देण्यात येईल. सध्या जिल्ह्यात सेल्फवर ०९ हजार ७४६ कामे आहेत.

रमेश बैस महाराष्ट्राचे २० वे राज्यपाल; मराठीतून घेतली राज्यपाल पदाची शपथ

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय वि.गंगापूरवाला यांनी रमेश बैस यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ दिली. श्री.बैस हे २० वे राज्यपाल असून त्यांनी मराठीमधून पदाची शपथ घेतली. शपथविधीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

राजभवनातील दरबार हॉलमध्ये झालेल्या या समारंभास राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा, लोकायुक्त विद्यासागर कानडे, राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्या.(नि.) के.के. तातेड, लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित नागरिक उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी राज्यपालांच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेल्या अधिसूचनेचे वाचन केले. राष्ट्रगीताने शपथविधी सोहळ्याची सुरुवात व सांगता झाली. शपथविधी सोहळ्यानंतर भारतीय नौदलातर्फे राज्यपालांना मानवंदना देण्यात आली.

राज्यपाल रमेश बैस यांचा परिचय

राज्यपाल रमेश बैस हे पूर्वीचे मध्यप्रदेश व सध्याच्या छत्तीसगड राज्याच्या तसेच राष्ट्रीय राजकारणातील एक आदरणीय नाव आहे.

संसदीय राजकारण, समाजकारण तसेच संघटन कार्याचा तब्बल पाच दशकांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या श्री. बैस यांनी सार्वजनिक जीवनात नगरसेवक पदापासून केंद्रीय राज्यमंत्री व राज्यपाल पदापर्यंत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडलेल्या आहेत.

दिनांक २ ऑगस्ट १९४७ रोजी रायपूर (छत्तीसगड) येथे जन्मलेले श्री. बैस यांचे शिक्षण रायपूर येथे झाले.

सन १९७८ साली ते पहिल्यांदा रायपूर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. सन १९८० ते १९८५ या कालावधीत ते मध्यप्रदेश विधान परिषदेचे सदस्य होते. याकाळात त्यांनी मध्यप्रदेश विधानमंडळाच्या अंदाजपत्रक समितीचे तसेच त्यानंतर ग्रंथालय समितीचे सदस्य म्हणून काम केले. सन १९८२ ते १९८८ या कालावधीत ते मध्यप्रदेश भारतीय जनता पक्षाचे प्रदेश मंत्री देखील होते.

सन १९८९ साली श्री. बैस रायपूर येथून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. त्यानंतर तब्बल सहा वेळा, म्हणजे एकूण सात वेळा लोकसभेवर निवडून आले आहेत.

सन १९९८ साली पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात श्री. बैस यांची पोलाद व खाण मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली.

सन १९९९ ते २००४ या कालावधीत त्यांनी रसायने व खते व त्यानंतर माहिती व प्रसारण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पहिले.

सन २००३ साली श्री. बैस यांना केंद्रीय खाण मंत्रालयामध्ये राज्यमंत्री पदाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला व त्यानंतर काही काळ ते केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयात राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) होते.

आपल्या प्रदीर्घ संसदीय जीवनात श्री. बैस यांनी पेट्रोलियम व नैसर्गिक वायु विषयक संसदीय समिती, लोकलेखा समिती, ऊर्जा मंत्रालय सल्लागार समिती, कोळसा आणि खाण मंत्रालयाची हिंदी सल्लागार समिती, नियम समिती आदी समित्यांचे सदस्य म्हणूनही कामकाज पाहिलेले आहे.

सन २००९ ते २०१४ या काळात श्री. बैस हे भारतीय जनता पक्षाचे लोकसभेतील मुख्य प्रतोद होते. सन २०१४ ते २०१९ या काळात १६ व्या लोकसभेचे सदस्य असताना ते सामाजिक न्याय व सक्षमीकरण विषयावरील संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष होते. श्री बैस यांनी दिव्यांग व्यक्ती तसेच तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) व्यक्ती अधिकार सुरक्षा विधेयकासंदर्भात व्यापक संशोधन व अध्ययन केले आहे.

सन २०१९ साली श्री. बैस यांची राज्यपाल पदावर नियुक्ती करण्यात आली. दिनांक २९ जुलै २०१९ ते १३ जुलै २०२१ या काळात ते त्रिपुराचे राज्यपाल होते. त्यानंतर दिनांक १४ जुलै २०२१ रोजी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी बदली करण्यात आली.

नवनियुक्त राज्यपाल श्री. बैस यांना समाजसेवेची आवड असून त्यांनी अनेकदा आरोग्य शिबिरे, नेत्र तपासणी शिबिर, तसेच ग्रामीण भागांमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. श्री. बैस यांनी छत्तीसगड धनुर्विद्या ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून देखील काम केले आहे. मध्यप्रदेश बीज व कृषी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी काम केले आहे.

पावणेसात लाखांचा गांजा जप्त

गोंदिया: अवैधरित्या गांजाची साठवणूक करून विक्री करीता बाळगल्या प्रकरणी कारवाई करून गांजासह आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. राकेशसिंग उर्फ बंटी राजुसिंग खतवार (ठाकूर) (३८) रा. वाजपेयी वार्ड, गोंदिया असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. खुशाल उर्फ पप्पु अगडे रा. श्रीनगर गोंदिया असे फरार आरोपीचे नाव सांगितले जाते. ही कारवाई १९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६.४५ वाजताच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केली. आरोपीच्या ताब्यातून ३३ किलो ६८८ ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला असून याची किंमत ६ लाख ७३ हजार ७६० रुपये सांगण्यात येते.

जिल्हा पोलिस अधीक्षक पदी रुजू झालेले निखिल पिंगळे यांनी अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील ताजने यांचे आदेशानुसार व मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे, पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांनी वरिष्ठांचे निर्देशानुसार जील्ह्यातील अवैध धंद्यांवर धाड कारवाई करण्यात येत आहे. शहरातील श्रीनगर येथील खुशाल उर्फ पप्पु अगडे याने राकेशसिंग उर्फ बंटी खतवार (ठाकूर) याचे वाजपेयी वॉर्ड गौतमनगर येथील घरात विक्रीकरीता अवैधरित्या गांजाची साठवणूक करुन ठेवला आहे, अशी माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलिस अंमलदार अर्जुन कावळे यांना रविवारी मिळाली.

माहिती प्राप्त होताच सदर बाब वरिष्ठांना कळविण्यात आली. वरिष्ठ पोलिस अधिकारी यांच्या निर्देशानुसार शहर पोलिस ठाणे हद्दीतील वाजपेयी वार्ड येथील आरोपी राकेश सिंग याच्या घरी संध्याकाळी पोलिस पथकाने छापामार कारवाई केली. पथकाने पंचायत समक्ष त्याच्या घराची झडती घेतली असता घराचे मधल्या खोलीत सज्यावर दोन प्लास्टिक पॉलीथीनच्या गठ्यामध्ये प्लास्टिक पॉलीथीनचे वेस्टन, आवरान करून पॅकिंग केलेले ३० नग पॅकेट आढळले. ते उघडून पाहिले असता त्यात ३३ किलो ६८८ ग्रॅम गांजा आढळला. या गांजाची किंमत ६ लाख ७३ हजार ७६० रुपए सांगितले जाते.

जप्त गांजा आरोपीसह शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी आरोपी खुशाल अगडे, राकेशसिंग खतवार (ठाकूर) यांचेविरुद्ध कलम ८ (क), २०, २९ एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांचे मार्गदर्शनात पो. अंमलदार स. फौ. अर्जुन कावळे, पो.हवा. राजू मिश्रा, भूवनलाल देशमुख, चेतन पटले, नेवालाल भेलावे, संतोष केदार,अजय रहांगडाले, मपोशी कुमुद येरणे, चा. पो. शि मुरलीधर पांडे यांनी केली.

केंद्रीय निवडणुक आयोगाच्या विरोधात शिवसेना (ठाकरे) गटाचे राष्ट्रपतींच्या नावे निवेदन

देवरी:- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक दशके संघर्ष करून शिवसेना उभी केली. हा पक्ष व धनुष्यबाण हा लाखो निष्ठावान शिवसैनिकांची अस्मिता आहे. भाजपाने शिंदे गटाला हाताशी धरून आयोगाला आमिष दाखवून हा पक्ष व चिन्ह चोरले आहे. आपण त्याचा तपास करून ते परत आणून द्यावे, अशी मागणीचे निवेदन केंद्रीय निवडणुक आयोगाच्या विरोधात शिवसेना (ठाकरे) गटाने राष्ट्रपतींच्या नावे पाठवले आहे.

केंद्रीय निवडणुक आयोगाने शिवसेना या पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण हे शिंदे गटाला बहाल केल्याबद्दल शिवसेना ठाकरे गटाचे देवरी तालुका शाखेच्या वतीने तीव्र निषेध केला असून या निर्णयाचा विरोध दर्शविणारे निवेदन महामहिम राष्ट्रपतींच्या नावे देवरीच्या तहसीलदारांना देण्यात आला.

ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख सुनील मिश्रा यांच्या नेतृत्वात सेना कार्यकर्त्यांचे एक शिष्टमंडळ स्थानिक तहसील कार्यालयावर धडकले. केंद्रीय निवडणूक आयोगाने बेकायदेशिररीत्या लोकशाहीची हत्या करीत शिवसेना या पक्षाचे नाव आणि निवडणुक चिन्ह हे शिंदे गटाला बहाल केल्याचे ठाकरे गटाचे म्हणणे आहे.

संरक्षित वनक्षेत्रात अवैध खोदकाम प्रकरणी कार्य.अभियंतासह अभियंत्यावर गुन्हा दाखल

गडचिरोली- जिल्ह्यातील कुरखेडा वनपरिक्षेत्र कार्यालयांतर्गत येत असलेल्या पुराडा ते मालेवाडा या राज्यमार्गावरील कक्ष क्रमांक १०४० मधून जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही कडेला अवैधरित्या वनविभागाच्या जागेतून मुरूमाचे उत्खनन करुन रस्त्याच्याकडेला अवैधरित्या पसरवून काम केल्याप्रकरणी वनविभागाने सार्वजनिक बांधकाम विभाग १ गडचिरोलीचे कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता व शाखा अभियंत्यासह ग्रंडर चालक राजू रविदास याच्याविरुधद् वनकायदयातंर्गत गुन्हा नोंदवल्याचे धक्कादायक माहिती समोर आली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी बी.एच.डिगोळे यांनी यासंदर्भात गुन्हा सरंक्षित वनक्षेत्रात खोदकाम केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून ग्रंडर जप्त करुन चालक राजू रविदास यास न्यायालयात हजर केले. २८ फेबुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावत तुरुंगात रवानगी केली.

तिरोडा-कवलेवाडा रस्त्यावर पूल बांधकामाचे भूमिपूजन

तिरोडा:- कवलेवाडा रस्त्यावर ७० लक्ष रुपये निधीतून पुल बांधकामाला मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. दरम्यान क्षेत्राचे आ. विजय रहांगडाले यांच्या हस्ते पूल बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाला पं. स. सभापती कुंता पटले, उपसभापती हुपराज जमाइवार, माजी उपसभापती ब्रिजलाल रहांगडाले, भाजप तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, कवलेवाडाचे सरपंच इंदूबाई दिलिप पारधी, ओमपप्रकाश भैरम, राजु बिसेन, पौणिमा कामडी, स्वाती चौधरी, मुंडीपार सरपंच चद्रलेखा पटले, राजू बिसेन व सर्व उपसरपंच सदस्य, सदस्या गण भाजपा वरिष्ठ कार्यकता व गावकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे धान खरेदीसाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

गोंदिया: शासकीय आधारभुत धान खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०२२-२३ मधील धान खरेदीकरीता शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत ३१ जानेवारी २०२३ रोजी संपलेली आहे. चालू हंगामात शासनाने खरीप हंगामासाठी धान खरेदीची मुदतवाढ दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत दिलेली आहे. करीता नोंदणी झालेल्या उर्वरीत सर्व शेतकऱ्यांनी २८ फेब्रुवारी पर्यंत आपल्या तालुक्यातील जवळच्या खरेदी केंद्रावर जाऊन धान विक्री पूर्ण करुन घ्यावी. धान विक्रीसाठी देऊन शासनाच्या धान खरेदी योजनेचा लाभ घ्यावा. असे जिल्हा पणन अधिकारी विवेक इंगळे यांनी कळविले आहे.

आंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पुकारला संप

गोदियाः- महाराष्ट्र राज्य आंगनवाडी बालवाडी कर्मचारी यूनियन आयटक व हिंद मजदूर सभेच्या आव्हाना वर अंगणवाडी बालवाडी कर्मचारी २० फेब्रुवारी २०२३ पासुन संपावर गेल्या असून जिल्हा परिषद कार्यालयासमोर निदर्शने करुन सरकारचे आपल्या मागण्याकंडे लक्ष वेधले.

आंदोलनात आंगणवाडी सेविका,सहायिका, मिनि कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करण्यात यावे.नियमित पेंशन लागू करण्यात यावे. थकीत रक्कम त्वरीत देण्यात यावे.मराठीमध्ये पोषण आहार टॅकर सुरु करुन नवीन मोबाईल देण्यात यावे. आंगणवाडी कर्मचारी यांना शासकीय कर्मचारीचा दर्जा देण्यात यावे आदी मागण्यांना घेऊन हे आंदोलन बेमुदत सुरु करण्यात आले आहे.

आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, आम्रकला डोंगरे, जिवनकला वैद्य, ज्योती डोंगरे, प्र विना गौतम राजलक्ष्मी हरिनखेडे.,ज्योती लिल्हारे, सुनिता मंलगाम, आदि प्रमुखांनी मोर्च्याला मार्गदर्शन केले.

जागृत पालक सुदृढ बालक अभियाना अंतर्गत ७९,६६४ बालकांची आरोग्य तपासणी

गोंदिया: जागृत पालक तर सुदृढ बालक अभियाना अंतर्गत आता पर्यंत ७९,६६४ बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आल्याची माहिति जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितिन वानखेडे यांनी दिली आहे.

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा आरोग्य प्रशासनाच्या वतीने ९ फेब्रुवारीपासून जागृत पालक सुदृढ बालक अभियान राबविण्यात येत आहे. दोन महिने राबविण्यात येणाऱ्या या अभियानासाठी २७२ आरोग्य पथक तयार करण्यात आले असुन त्यात राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत वैद्यकिय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी, भरारी पथकाचे मानसेवी वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्फत जिल्ह्यातील बालकांची तपासणी करण्यात येणार असल्याची माहीती अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांनी दिली आहे. जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्ष वयोगटातील अंगणवाडी, बालवाडी व खाजगी नर्सरीतील १,०७,६४४ बालकांची तपासणी करण्यात येणार आहे तसेच ६ ते १८ वर्ष वयोगटातील शासकिय, खाजगी शाळा, अनुदानित शाळा, दिव्यांग शाळा व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची तसेच शाळा बाह्य मुले व मुलांची २,३७,२६५ असे एकुण ३,४४,९०९ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यात शासकिय शाळा १०८८, खाजगी शाळा २४९, अनुदानित शाळा २६१, दिव्यांग शाळा आश्रमशाळा ५३, अंगणवाडी/बालवाडी १९०२, खाजगी नर्सरी १२ ईत्यादी मधुन २७२ वैद्यकारी पथक शाळानिहाय भेटी देवुन तपासणी करण्यात येणार आहे.

पीएमश्री योजने अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील १९ शाळांचा समावेश

गोंदिया : नुकताच राज्यातील ८४६ शाळांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या पीएमश्री योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. देशभरात पहिल्या टप्प्यात १५ हजाराहून अधिक शाळा उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सवीत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्यात येणार असून यात राज्यातील ८४६ शाळांचा समावेश करण्यात येणार आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात गोंदिया जिल्ह्यातील पात्र १९ शाळांचा समावेश करण्यात आलेला आहे.सदर योजने करिता शाळेचा सर्वांगीण विकास करणे साठी १ कोटी ८८ लक्ष रुपयांचा निधी ५ वर्षात खर्च करण्यात येईल अशी माहिती गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी दिली.

यात आमगाव तालुक्यातील जि.प.उच्च प्राथमिक शाळा करंजी, जि.प. उच्च प्राथमिक शाळा तिगाव, अर्जुनी मोरगांव तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा झाशीनगर, जि.प.उच्च प्राथमिक शाळा निमगाव, जि.प. प्राथमिक शाळा अर्जुनी मोरगाव, देवरी तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा पुराडा, जि.प. प्राथमिक शाळा भागी, जि.प. प्राथमिक शाळा देवरी, गोंदिया तालुक्यातील जि.प. भारतीय विद्यालय एकोडी, जि.प. उच्च प्राथमिक शाळा रतनारा, मनोहर म्युन्सिपल उच्च शाळा, गोरेगाव तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा मुंडीपार, जि.प. उच्च प्राथमिक शाळा तुमखेडा, सडक अर्जुनी तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा डव्वा, जि.प. उच्च प्राथमिक शाळा खडीपार, सालेकसा तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा झालिया, जि.प. हिंदी उच्च प्राथमिक शाळा विचारपूर, तिरोडा तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा कवलेवाडा, जि.प. उच्च प्राथमिक शाळा कोडेलोहारा या शाळांचा समवेश आहे.

केंद्र सरकारची पीएमश्री योजना राज्यात लागू करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

मुंबई : राज्यातील सर्व शाळांचे पूर्ण स्वरूप बदलण्याबाबतचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महाराष्ट्रातील शाळांचे पूर्ण स्वरूपच बदलणार असून केंद्र सरकारची पीएमश्री योजना राज्यात देखील लागू करण्यात येणार आहे. आज झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात ८१६ शाळा विकसित करणार आहे.

केंद्र सरकारने सप्टेंबर २०२२ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. या योजनेअंतर्गत देशात १४ हजार ५९७ शाळा सुरु करण्यात येणार आहे. आदर्श शाळा म्हणून या शाळा ओळखल्या जातील असे सांगितले जात आहे. देशातील १८ लाख विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. पार पडलेल्या मंत्रिमंडळाच या बैठकीत "प्रधानमंत्री स्कूल फॉर रायजिंग इंडिया' महाराष्ट्रात राबवण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंत्रीमंडळामध्ये खलबते झाली.

अशी आहे पीएमश्री योजना

या शाळेत नवीन तंत्रज्ञान, स्मार्ट क्लास, खेळ आणि आधुनिक पायाभूत सुविधा यावर विशेष लक्ष देण्यात येईल. शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे, राज्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठीही उपायोजना सुचवल्या जातील.

इटखेडा जि.प.क्षेत्रातील दहा गावांना मिळणार शुध्द पिण्याचे पाणी

जि.प.सदस्य पौर्णिमा ढेंगे यांचा पुढाकार

अर्जुनी मोरगाव: तालुक्यातील इटखेडा जिल्हा परिषद क्षेत्रातील दहा गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायम स्वरूपी मिटणार आहे. त्यासाठी इटखेडा क्षेत्राच्या जि.प. सदस्य पौर्णिमा ढेंगे यांच्या पुढाकाराने जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत साडेचार कोटीचा निधी मंजूर झाला असून दहा गावांमधील नळयोजनेच्या कामाचे कायारंभ आदेश प्राप्त झाले आहे. त्यामुळे लवकरच गावातील प्रत्येक घरात शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार आहे.

तालुक्यातील इटखेडा क्षेत्राच्या जि.प. सदस्या पौर्णिमा ढेंगे यांनी मागील झालेल्या निवडणुकीत इटखेडा जि.प. क्षेत्रातून कपबशी चिन्हावर अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आल्या होते. दरम्यान, पती हे भाजपाचे जेष्ठ नेते असल्याने त्यांनी भाजपात प्रवेश केला व भाजपवासी झाल्या. निवडणुकीदरम्यान प्रत्येक मतदारांना क्षेत्रातील मुलभूत समस्या व प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही दिली होती. निवडून आल्यानंतर आश्वासनपूर्ती करण्यासाठी प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीमध्ये विकास कामाचा आढावा घेतला. क्षेत्रात पिण्याच्या शुद्ध पाण्याची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले व जलजीवन मिशन अंतर्गत क्षेत्रातील दहा गावात पाणी पुरवठ्याची कामे मंजूर होऊन साडेचार कोटीचा निधी प्राप्त झाला. तसेच प्रत्यक्षात कामाचे कार्यारंभ आदेश सुद्धा प्राप्त झाले.

प्राप्त निधितून इटखेडा येथे ३६ लाख २७ हजार ३८६, खाम खुरा ८६ लाख ३० हजार ४००, बोदरा (देऊळगाव) ९३ लाख ९१ हजार २७३, तिडका (करड) ८९ लाख ५६ हजार ५९०, इसापूर ४० लाख ९३ हजार ५४६, घाटी पळसगाव ८ लाख २९ हजार ३७३, कन्हाळगाव ३१ लाख ९९ हजार ९९४, येगांव ३९ लाख ९२ हजार ६६, वडेगाव स्टे. ४२ लाख ५१ हजार ४८० तर धाबेटेकडी आदर्श येथे १९ लाख ४७ हजार ७४३ असा एकून साडेचार कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

यातील बोदरा (देऊळगाव) व कन्हाळगाव येथे भूमिपूजन झाले असून उर्वरित गावातही लवकरच भूमिपूजन करुन कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. त्यामुळे क्षेत्रातील दहा गावांमध्ये आता नळ योजनेद्वारे प्रत्येक घरात शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार आहे. या बद्दल लाभार्थे ग्रामस्थांनी पौर्णिमा ढेंगे यांचे आभार मानले.